म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
सं. क्र. २६१८



REFBK-0026279
REFBK-0026279

# गंधयात्रा

देविदास पोरे

## आमची आगामी प्रकाशने

### ना. रा. कदम लिखित

## शिव - क्रांति

शिवाजी महाराजांच्या क्रांतिकारी
कर्तृत्वावर प्रकाशझोत टाकणारी
आणि महाराष्ट्र शासनाने विद्यालय
व महाविद्यालयांकरिता पुरस्कृत
केलेली मौलिक हिन्दी साहित्यकृती

द्वितीय आवृत्ती : मूल्य १५ रुपये

•

## शिवाजी : एक स्वयंभू व्यक्तित्व

शिव-छत्रपतींच्या चरित्राचा आणि मनाचा
मागोवा घेणारी साहित्यकृती

मूल्य : ३० रुपये

•


कर्मण्येवाधिकारस्ते
श्री
भारतीय साहित्य सेवक संघ प्रकाशन

संदर्भ कार्य
२६१८
२६२५८
८।२।९७

२६१८
२६२५८
कार्य ८।२।९७

REFBK-0026279
REFBK-0026279

# गंधयात्रा

देविदास पोरे



भारतीय साहित्य सेवक संघ प्रकाशन, मुंबई



# गंधयात्रा

देविदास पोरे

प्रकाशक
भारतीय साहित्य सेवक संघ
द्वारा– श्री. ना. रा. कदम
६३/२२४६ टिळक नगर
चेंबूर, मुंबई ४०० ०८९

© सौ. कविता पोटे
व १७९/४, शासकीय वसाहत
वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१

मुखपृष्ठ / मांडणी
बाळ बेंडखळे

प्रथमावृत्ती
१ जून १९९०

मूल्य : तीस रुपये

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
४६१/४ ' शिव-पार्वती '
टिळक रोड
पुणे ४११ ०३०

२९९८
काव्य २९२७९

वडिलांच्या आठवणींना
आणि
रविंद्रनाथ टागोर
कुसुमाग्रज
पु. ल. देशपांडे
जी. ए. कुलकर्णी
आरती प्रभू
ना. धों. महानोर
या प्रतिभावंतांना—

—देविदास पोटे



## मनोगत

शब्द...निर्मिती–उत्सव करणारे...सौंदर्यानुभूती देणारे...बालपणीच्या उंबरठ्यावर कधीतरी शब्द मनात लयीचे फेर धरून बसले...सुरांत भिजून आले... सुरांचे कल्लोळ गावाच्या मातीत नि आसमंतातच रुजलेले... मानवी मनाचे विविध रूपाविष्कार नि निसर्गाची अनंत रंगरूपं साकारीत शब्दांचे हिंदोळ उमटत राहिले. आकाशाच्या निळाईतून, फुलांच्या सर्ववेधी गंधयात्रेतून नि ओल्या चांदण्यातून वाहणारी अनंत निसर्ग-रूपं हा मानवी मनाचाच विश्वात्मक आविष्कार आहे आणि शब्द हे विश्वात्मक देवाचेच सूक्ष्म रूप आहे अशी माझी धारणा आहे. कवितेची साथ–संगत बालपणापासूनचीच. गेल्या पंचवीस-तीस वर्षांत आयुष्यात अनेक वादळे आली... अन् गेली! पण कवितेची सोबत अविचल, अविरत राहिली. अंतर्मुख करीत राहिली. कवितेनं जीवनानंदाचे माप भरभरून दिले एवढेच कृतज्ञतेने सांगावेसे वाटते.

माझ्या कवितेच्या या वाटचालीत प्रेरणा आणि शक्ती देणाऱ्या सर्व सुहृदांचे ऋण अनमोल आहे. श्रीमती शांताबाई शेळके यांनी आपुलकीने आणि अगत्याने प्रस्तावना लिहून दिली. त्यांचे ऋण शब्दातीत आहे. माझे सुहृद सर्वश्री प्रभाकर-राव कुलकर्णी, किशनराव चिंचोळीकर, प्रा. केशव परांजपे, किरण कुलकर्णी, रमेशकुमार लिखार, रविकांत वराडकर, अरुण मालवणकर, शंकर मेनन, सौ. नीला सत्यनारायण, निर्मलचंद्र पवार, सौ. व श्री. सुरेश केळकर, प्रा. विसुभाऊ बापट, आर. पी. मिर्झा, दामोदर सुर्वे, श्रीकांत कुलकर्णी, सौ. व श्री. अनिल फातरपे-कर, मोरेश्वर पटवर्धन, सौ. समिधा सोनार, उस्मान पंची, चंद्रकांत माळी, रमेश गांगुर्डे, आ. श्री. पिंपळापुरे, विलास देशपांडे, नरेश यावलकर, वसंतराव घोरपडे, प्रभाकर मुजुमदार, अ. कृ. पंत, डॉ. चंद्रशेखर कपाळे, प्रा. केशव महागावकर, कै. प्रभाकर म्हात्रे, आव्हाड, गोस्वामी, संखे, बालनाथ म्हात्रे या सर्वांच्या ऋणात राहणे भाग्याचे आहे.

" चित्र हे रंगांनी काढलेले काव्य आहे आणि काव्य हे शब्दांनी काढलेले चित्र आहे. " ही संकल्पना रंग–शब्दांच्या दोन्ही अंगांनी मनोरेखित करणारे माझे चित्रकार व कविमित्र श्री. शरद कुलकर्णी आणि कलात्मक मुखपृष्ठ व मांडणीचे काम आत्मीयतेने करून देणारे चित्रकार व कविमित्र श्री. बाळ बेंडखळे या सुहृदांचा स्नेह मोलाचा आहे.

" गंधयात्रा " पुस्तकरूपाने प्रकाशित करणारे श्री. नारायणराव कदम आणि भारतीय साहित्य सेवक संघ यांचे स्नेहपूर्ण बंध अतूट आहेत. कल्पना मुद्रणालयाचे मुद्रणतपस्वी श्री. अण्णासाहेब लाटकर आणि सहकारी यांनी पुस्तकाचे रंगरूप देखणे बनविले आहे. त्यांचे मनःपूर्वक आभार.

माझी पत्नी सौ. कविता, भगिनी सौ. सुनिता अन्य कुटुंबीय व आप्त यांचा माझ्या कवितेतील सहभाग प्रेरणा आणि आत्मशक्ती देणारा... त्यांचे आभार कसे मानू?

देविदास पोटे

पूर्वप्रसिद्धी। ऋणनिर्देश : वाङ्मयशोभा ।। सुधन्वा ।। लोकसत्ता ।। लोकप्रभा ।।
।। कविताश्री ।। अनुबंध ।। युगबोध इ० ।।

# अनुक्रमणिका


१. काय म्या पामरे १
२. इथे फक्त दिल्यानेच २
३. लोक हो ५
४. मी आभाळ होतो तेव्हा ६
५. शिवप्रभू राजे झाले ८
६. तटस्थपणे १०
७. फुलांच्या गावातील स्वप्नप्रदेशात ११
८. आठवणी १२
९. आज सौभाग्य सोहळा १३
१०. धुवांधार रात्र १४
११. सोहोनी १५
१२. झुले सुखाचा हिंदोळा १७
१३. उद्या होईल प्रकाश १८
१४. कुठं आभाळाचा अर्थ २०
१५. पिठुर चांदणे २२
१६. आपणच २३
१७. अहिल्याबाई : कर्मयोगिनी... तपस्विनी... २५
१८. रंग–लावण्याचा लळा २८
१९. तुला मागतो दान ३०
२०. भिंत ३१
२१. कुणी एक म्हणे ३२
२२. या दिवसांचा ३३
२३. मनाचा मनवा ३४
२४. स्त्रीचं जीवन : एक सर्कस ३५
२५. कुठे वाजती पैंजण ३९
२६. एक स्वप्न साधेच ४०
२७. काळोखलेल्या कातरवेळी ४१
२८. मनाची पालवी हरवणारी ४२
२९. चेहरा ४३
३०. कळी कळी फुलताना ४४
३१. बोभाट ४५
३२. सतक ४६
३३. तोच नभात चांदवा ४८
३४. नाही कळले कुणा ४९
३५. आज पाऊस पाऊस ५०
३६. चंद्र सांभाळ गं ५१
३७. मी पाहिले ना ५२
३८. मनी लागुनी झुरणी ५३
३९. तुमचा न्याय ५४
४०. मथितार्थ ५५
४१. दशक ५६
४२. तीन शब्दुल्या ५९
४३. कुठून काय ? ६०
४४. सात हायकू ६१
४५. शिल्पस्थ सोनचाफे ६२
४६. एक आनंदगर्भ स्मितरेषा ६३
४७. गाणे मनात ओले ६५
४८. मातीतच रुजली कविता ६७
४९. टाकित ये पदन्यास ६८
५०. हा हिरवा एकांत पुन्हा ६९
५१. चंद्रगौर आनंदाचा ७०
५२. प्रांगांतुन प्रीतीचे ७१
५३. कळाया लागले ७२
५४. मेंदीत चांदण्याच्या ७३
५५. गंधयात्रा आज आहे ७४

# सुस्वागत

मुंबईला मी ' साहित्य सहवास 'मध्ये राहत होते त्या वेळी आमच्या घरापासून जवळच ' चिंचोळीकर ' हे साहित्यप्रेमी गृहस्थ राहत असत. ते अधूनमधून ' साहित्य सहवासा 'त काही साहित्यिकांना भेटण्यासाठी येत. असेच ते एकदा माझ्याकडे आले. चिंचोळीकर यांचे साहित्यप्रेम, विविध भाषांतली पारंगतता आणि स्वतःही काही लेखन करण्याची त्यांना असलेली आवड यामुळे पहिल्या भेटीतही ते मला दीर्घकालीन परिचित व्यक्तीसारखेच वाटले. नंतर एकदा मी त्यांच्याकडे गेले. आमच्या साहित्यविषयक गप्पा चालू असताना चिंचोळीकरांचे एक स्नेही देविदास पोटे हेही तिथे आले. पोटे यांच्या त्या पहिल्या भेटीत मला दोन गोष्टी जाणवल्या. एक म्हणजे चिंचोळीकर आणि पोटे या उभयतांमध्ये साहित्य, काव्य यासंबंधीच्या समान अभिरुचीतून, तद्विषयक ओढीतून जडलेले उत्कट स्नेहबंध आणि दुसरे म्हणजे पोटे यांच्या ठायी रुजत असलेला कवित्वाचा अंकुर. पोटे तेव्हा नुकतेच कविता करू लागले असावेत. त्यांच्या काही कविता त्या दिवशी मी त्यांच्याच तोंडून ऐकल्या. नवथर कवितारचनेचा उल्लास, शब्दांचे प्रेम, स्वप्नाळू वृत्ती हे सारे त्यांच्या त्या कवितांमधून ओसंडत होते. त्या वेळीच मी मनाशी खूणगाठ बांधली की पोटे सातत्याने कवितालेखन करणार. तेच त्यांच्या खरे आवडीचे, आत्मक्रीडेचे क्षेत्र आहे. ती साक्ष मला पटल्यामुळेच ' गंधयात्रा ' हा आपला पहिलावहिला कवितासंग्रह जेव्हा पोटे यांनी प्रस्तावनेसाठी माझ्यासमोर ठेवला तेव्हा मला फारसे नवल वाटले नाही. वाटला तो केवळ पोटे यांच्यासंबंधीच्या माझ्या अपेक्षा खऱ्या ठरल्याचा आनंद. त्या आनंद भावनेनेच या नव्या तरुण आणि उमलत्या कवीच्या कवितांचे मी स्वागत करत आहे.

' गंधयात्रा ' या संग्रहात पोटे यांनी आपल्या काही निवडक कविता संकलित केल्या आहेत. या कविता वाचताना सर्वप्रथम मला जाणवली ती पोटे यांची निर्भरशील, स्वप्नाळू वृत्ती. गेल्या काही वर्षांत मराठी कवितेमध्ये सामाजिक

बांधिलकीचा आणि समाजविषयक सजग जाणिवेचा एक जोरदार प्रवाह आला आहे. तसे पाहिले तर केशवसुतांपासून तो नारायण सुर्वे यांजपर्यंत मराठी कवितेने ही बांधिलकी आणि जाणीव सतत उत्कटपणे जपलेली आहे. सौंदर्यप्रेमी स्वप्नाळू-पणा आणि सामाजिक जागरूकता या दोन्ही गोष्टी आपल्याकडे सुरुवातीपासून हातात हात घालून वावरत आल्या आहेत. केशवसुत, बी, मर्ढेकर, विंदा करंदीकर, सुर्वे या प्रवाहाबरोबरच तांबे–बालकवी–गोविंदाग्रज–बोरकर–पाडगावकर–महानोर हा कविताप्रवाहही सातत्याने व समर्थपणे वाहत राहिला आहे. माधव जूलियन, कुसुमाग्रज या श्रेष्ठ कवींमध्ये तर या दोन्ही प्रवाहांचे सुंदर सामरस्य झालेले दिसते. खरे म्हणजे हे प्रवाह तसे परस्परनिरपेक्षही नाहीत. तरीही अलीकडे गेली काही वर्षे दलित कवींच्या प्रखर कवितेमुळे असेल कदाचित–सामाजिक बांधिलकीच्या काही कविता तरी आपण लिहिल्याच पाहिजेत, त्या तशा न लिहिल्या तर आपल्या कवितेत काही उणीव राहील अशा धोरणामुळेही आपल्या मूळच्या प्रवृत्तीशी जुळो न जुळो, अनेक नवोदित कवी सामाजिक बांधिलकीच्या कविता अट्टाहासाने लिहिताना दिसतात. अशा हठाकृष्ट 'सामाजिक' कविता वाचकांच्या मनावर कसलाही परिणाम करत नाहीत. त्यातला उसना आवेश, पोकळ आव आणि कृतक कला तावडतोब उघडी पडते. 'गंधयात्रा'मधल्या कविता वाचताना अशा खोटेपणाचा त्यात मला लवलेशही आढळला नाही ही गोष्ट मुद्दाम नमूद करावीशी वाटते. पोटे यांची वृत्ती आत्मलक्षी, सौंदर्यप्रेमी आणि स्वप्नाळू आहे. त्या वृत्तीशी इमान राखूनच त्यांनी आपल्या कविता लिहिल्या आहेत. कवितालेखनाच्या सुरुवातीच्या काळात समकालीन थोर कवी, त्यांची शब्दकळा, कवितेत रूढ असणाऱ्या चालू फॅशन्स किंवा टुमी यांचा तरुण कवींवर गडद परिणाम होतो. या साऱ्यांचे अनुकरण करण्याचा मोहही त्याला होतो. काही प्रमाणात हे स्वाभाविकही असते. पोटे यांचे विशेष कौतुक वाटते ते अशासाठी की ते अशा अनुकरणापासून पुष्कळसे अलिप्त राहिले आहेत. तसे काही कवींच्या काव्याचे अस्पष्ट पडसाद त्यांच्या कवितेत क्वचित ऐकू येतात. नाही असे नाही. कुठे 'गर्द केशरीचे रंग ओघळलेले' दिसतात आणि महानोरांची तत्सदृश ओळ आठवते तर कुठे 'चंद्रगौर आनंदाचा गंध' हुंगताना आरती प्रभूंच्या कवितेतली चंद्रगौरा मनःचक्षूंसमोर उभी राहते. पण अशी स्थळे पोटे यांच्या कवितांत फारच कमी आहेत. इथे जी शब्दकळा, जो कल्पनाविलास आणि जे जीवनदर्शन आहे ते पोटे यांचे स्वतःचे आहे. या प्रांजलपणामुळे 'गंधयात्रा'मधील अनेक कविता अस्सल-पणाने मनावर ठसतात –

पोटे यांची वृत्ती मुख्यत्वे स्वप्नाळू आणि सौंदर्यप्रेमी आहे. तरी सामाजिक

जाणिवेला ते संपूर्णतया पारखे आहेत असे मात्र नाही. भोवतालचे कुरूप वास्तव, माणसांच्या वागण्याबोलण्यातील विदारक विसंगती आणि त्यामुळे जीवनाला आलेले लाचार दैन्य पोटे यांना तीव्रतेने जाणवते. ते व्यथित होतात आणि मग 'आपणच' सारखी उपरोधाच्या भाषेत जीवनावर जळजळीत भाष्य करणारी समर्थ कविता त्यांच्या लेखणीतून उतरते. या कवितेतल्या पुढील ओळी बघाव्यात.

रक्ताळलेल्या भूमीवरून चालताना
डोळ्यात साठवायचे
बुद्धाच्या मुखावरील
निरागस करुणामय स्मितहास्य
येशूचे कारुण्य जपताना
उभारायचा नवा सूळ
पायांखालच्या मातीचे इमान
बळी देण्यासाठी

मनातला तळतळाट, चीड, तडफड या कवितेत अतिशय परिणामकारकतेने व्यक्त करून पोटे शेवटी म्हणतात—

आपले रंगहीन बेचव
'हॅम्लेट' झालेले आयुष्य
आपणच कुरतडायचे रातदिन
मातीचे आवाहन विसरून
आपणच भरकटायचे दिशाहीन
आपल्या शरण-गाथेचे आपणच आहोत भाष्यकार
आपल्या सर्वनाशाचे आपणच आहोत शिल्पकार

'गंधयात्रा' मधल्या उत्कृष्ट कवितांपैकी 'आपणच' ही एक कविता आहे. आजच्या वास्तवाने कविमनाला आलेली हताशता इथे प्रकट झाली आहे. पण पोटे यांची वृत्ती मूलतः आदर्शवादी, आशावादी आहे. त्यामुळे 'मी आभाळ होतो तेव्हा' सारख्या कवितेतून ते मानवी जीवन कितीही दुःखपूर्ण असले तरी त्याचे भविष्य सुंदर आणि आशयसंपन्न होणार आहे असा विश्वास व्यक्त करतात. कवी अनिल म्हणतात 'अवघ्या अभाग्यांचे अश्रू माझ्या डोळ्यांत' त्याप्रमाणे पोटेही 'आपणच आभाळ होऊन अवघ्या मानवजातीची रंगहीन दुःखे कवेत घेण्याची' मनीषा व्यक्त करतात. याच कवितेत ते म्हणतात—

मी आभाळ होतो तेव्हा
चैतन्याच्या भूमिगर्भातून
पेरीत जातो आभाळ
आणि उगवत जाते
मनामनांच्या जाणिवेतून
आभाळच आभाळ !

आपण आभाळ व्हायचे आणि मनामनांच्या जाणिवेतून आभाळच आभाळ रुजवून ते उगवण्याची जिद्द बाळगायची हा पोटे यांचा आत्मविश्वास त्यांच्या तरुण, आशावादी वृत्तीला किती साजून दिसतो. अगदी नेमक्या अशाच नाही तरीही स्वतःभोवतालचे जग सहानुभूतीने न्याहाळण्याच्या जाणिवेतूनच पोटे यांची आणखी एक सुंदर कविता निर्माण झाली आहे. ती म्हणजे 'सोहोनी'. हे एक अतिशय जिवंत आणि हृद्य असे व्यक्तिचित्र आहे. मनमुराद निरागस गप्पाष्टके झोडणारा, रेडिओ, क्रिकेट, गाणे, तबलावादन अशा सर्व गोष्टींत रस घेणारा साधा, सरळ सोहोनी आपल्या स्मृतीतून लवकर जाणे अवघड आहे. नेणिवेच्या काठावरचा हा एक भोळाभाबडा जीव. नियतीने त्याची क्रूर थट्टा मांडली आहे. तरीही जीवनाच्या यात्रेचा तो एक निष्ठावंत वाटसरू आहे. बटबटीत डोळ्यांनी तो जग न्याहाळतो. खळखळून हसतो. ते हसणे कधी प्रसन्न असते तर कधी केविलवाणे. मनातले सारे ताण तो तबल्यावरच्या आपल्या बोटांच्या द्रुत लयीतल्या नर्तनात बुडवून टाकतो. कवीला त्याचे ते साधे सरळ काहीसे केविलवाणे हसणे, तबला वाजवणे कुठेतरी खोलवर स्पर्शून जाते. आणि त्या जाणिवेतून 'सोहोनी'-सारखी कविता सिद्ध होते. 'गंधयात्रा'मधली ही एक वैशिष्ट्यपूर्ण कविता आहे.

अशा काही सामाजिक आशयाच्या कविता पोटे यांनी लिहिल्या असल्या तरी त्यांची कविता खरी फुलून रसरसून येते ती प्रीतीच्या तृप्त सहवासात, निसर्गाच्या विविध रंगांत आणि स्वप्नांच्या तरल गूढ प्रदेशात. 'गंधयात्रा'मध्ये अनेक प्रेमकविता आहेत. या प्रेमाची कवीची जाणीव विशिष्ट स्त्रीरूपाशीच केवळ निगडित आहे असे नाही. त्याचे प्रेम जीवनाला, जगाला कवेत घेते.

प्रेम द्यावे प्रेम घ्यावे
हाच जीवनाचा धर्म

अशा ओळींतून त्याच्या प्रेमाचे उदात्त स्वरूप आपल्या ध्यानात येते.

इथे फक्त दिल्यानेच
रंग प्रेमाचा वाढतो

हीत्याची प्रेमाकडे बघण्याची दृष्टी आहे. या उत्कट प्रेमाच्या सामर्थ्याने साऱ्या जगालाच आधार दिलेला आहे ही भावना व्यक्त करताना कवी म्हणतो—

किती अमृताचे क्षण
रोज फुलती जगात
आणि तळपते वीज
दूर सावळ्या ढगात
जरी अथांग सागर
असे त्यालाही किनारा
दैव देईल भरून
उणा पडेल घेणारा !

असे प्रीतीचे दान जगातली दुःखे, निराशा दूर करून त्याला समृद्ध, श्रीमंत करते. या प्रेमजाणिवेची व्यक्तिगत चित्रेही अनेक कवितांतून पोटे यांनी रेखाटली आहेत. ' कुठे वाजती पैंजण ', ' एक आनंदगर्भ स्मितरेषा ', ' चंद्र सांभाळ गं', ' हा हिरवा एकान्त ', ' प्राणांतुन प्रीतीचे ' अशा अनेक कवितांमधून प्रणय-भावनेची विविध रूपे दिसतात. या कवितांतून पोटे यांची शब्दकळाही तरल, नाजुक, अर्थवाही बनते. त्यातल्या कितीतरी ओळी वाचून संपल्यावरही मनात घोळत राहतात. उदाहरणार्थ—

– तुझ्या डाळिंबी ओठांत
जागे तृप्तीची पहाट
धुंदी स्वप्नाच्या गंधाची
काळ्या केसांमध्ये दाट

स्वप्न पापणीकाठाशी
अंगी मोहर रंगाचा
जसा हिरव्या वेलीला
भार उभार अंगाचा

– या हास्याच्या प्रसन्न धारेत
भिजून जाते आरपार माणसाचे मन
रोम रोम पुलकित होतो
अंगांगात आनंदाच्या पौर्णिमा उमलतात

अर्पणाची गोड तृप्ती
भरे काठोकाठ मनी
चंद्र हळूच डोकावे
मनी लागुनी झुरणी

पोटे यांच्या प्रेमकवितांप्रमाणेच त्यांच्या निसर्गकविताही वेधक आहेत. निसर्गाची अनेक रम्य रूपे त्या कवितांतून जिवंतपणे प्रकटतात. 'फुलांच्या गावातील स्वप्नप्रदेशात' या कवितेतले पुढील निसर्गचित्र किती सुंदर आहे!

अनाम स्वप्नप्रदेश...फुलांचा एक गाव
फुलांच्या गावातील सुगंधाची एक नाव
गर्द केशरियाचे रंग ओघळलेले
आभाळाच्या पोकळाईवर
फुलांच्या देठातून स्पर्शबावरा रोमांच
सतारीतून स्वरतरंग निघावेत तसा
क्षितिजाक्षितिजावर सुगंधाची गाणी....

'तोच नभात चांदवा' या कवितेत निसर्गाच्या सनातन सातत्याला बिलगून असलेले त्याचे नित्यनूतनपण पोटे यांनी फार चांगल्या रीतीने व्यक्त केले आहे ते म्हणतात—

तोच नभात चांदवा
रोज नवीन चांदणे
तीच ओळखीची झाडे
नव्या पालवीचे लेणे

तोच नदीचा प्रवाह
परी रोज नवे पाणी
तेच पाखरांचे सूर
परी रोज नवी गाणी

पाऊस हा तसा तर नेहमीचा. आणि नित्य परिचयाचाही. पण त्या पावसाचे अतिशय हृद्य चित्रण पोटे यांनी 'आज पाऊस पाऊस' या आपल्या कवितेत केले. आहे. तिच्यातल्या या ओळी बघाव्यात—

आज हिरव्या रानात
ओला उत्सव पानांचा
निळ्या सागरलाटेत
देठ भिजला मनाचा

आज पाऊस पाऊस
गंध मातीचा आभाळी
देही सौभाग्य हिरवे
टिंब रेखिले कपाळी

आज पाऊस पाऊस
मन पाऊसपणात
निळा नितळ ओलावा
तनामनात, प्राणात

पोटे यांच्या कवितांचे स्वरूप हे असे आहे. त्यात एक नितळ निर्भरपणा आहे. जीवनावरचे उत्कट प्रेम आहे. उदंड आशावाद आहे आणि निसर्गाच्या रंगारूपाची गंधांची संवेदनाक्षम जाण आहे. पोटे यांची शब्दकळाही प्रसन्न आहे. आज मराठी कवितेत वैपुल्याने दिसणारा विक्षिप्त वा चित्रविचित्र प्रतिमांचा सोस त्यांना नाही. तरी त्यांच्या काही प्रतिमा फार सुंदर, अर्थपूर्ण आहेत. 'हिरवे लाघव', 'स्वप्नांचे गालिचे', 'आत्मकेंद्री इतिहास', 'मांसल भोगातून शोधलेले परमार्थाचे योग', 'जाईजुईच्या कुशीत बोलणारा वाऱ्याचा शब्द', 'गंधभरी स्वप्ने' यांसारख्या त्यांच्या प्रतिमा नावीन्यपूर्ण आहेत त्याप्रमाणेच कवितेच्या आशयाला त्या एक वेगळे परिमाणही देताना दिसतात. पोटे यांच्या कवितांची शैली साधी सरळ आहे. तीत फार मोठा कल्पनाविलास नाही. तरीही 'नभ शिंपून चांदणे भरी धरित्रीची ओटी' यासारखी एखादी भव्य कल्पना त्यांच्या कवितेत मध्येच येऊन जाते आणि मग ती सारी कविताच एका वेगळ्या पातळीवर चढते. 'गंधयात्रा' मधल्या बहुतेक कविता मनाला वेधून घेतात. पण त्यांत दोष उणिवा नाहीत असे नाही. आज मराठी कवितेची शैली खूपच प्रगत झाली आहे. ती अल्पाक्षर आणि अर्थसघन होत आहे. कडव्यांचे मणी ओवून लांबलचक वर्णनाची कविता करण्याची पद्धती इतिहासजमा झाली आहे. पोटे यांच्या काही कवितांत मात्र अद्यापही याच पद्धतीचा अवलंब केलेला दिसतो. 'शिवप्रभू राजे झाले' या कवितेत ते एकापुढे एक अशा कल्पना, वर्णने मांडत जातात. कडव्यांना कडवी जोडत जातात. 'आठवणी' या कवितेतही आठवणींच्या विविध प्रकारांची केवळ यादी सादर केली जाते. अशा प्रकारच्या कविता कितीही लांबवता येतात किंवा कुठेही थांबवता येतात. भावनांच्या उत्कटतेपेक्षा इथे शब्दांचाच कल्लोळ जाणवत राहतो. काही ठिकाणी तर कवी कवितेच्या आशयाला भिडण्याऐवजी केवळ शब्दाशीच खेळण्यात रमला आहे असे वाटते. 'कुठे आभाळाचा अर्थ' ही कविता अशा प्रकारच्या शाब्दिक खेळातून सिद्ध झाली आहे. सबंध कविताभर शब्दांची फक्त उलटापालट केलेली दिसते.

कुठे पाकळ्यांचे स्वप्न
कुठे स्वप्नांच्या पाकळ्या
कुठे भरल्या रानात
दिशा अजून मोकळ्या

कुठे प्रेमाचेच झाड
कुठे झाडाचेही प्रेम
कुठे फुलल्या कळीला
पहा विचारून क्षेम

अशी अनेक कडवी या कवितेत येतात. मग पावसाचे पक्षी आणि पक्ष्यांचा पाऊस, अंतरीच्या खुणा आणि खुणांचे अंतर, दंभाची समाधी आणि समाधीचा दंभ, डोळ्यातला प्राजक्त आणि प्राजक्ताचे डोळे अशी केवळ शब्दाची कसरत दिसत राहते आणि फारसा अर्थ निष्पन्न होत नाही. 'चेहरा' ही कविता 'आठवणी' कवितेसारखीच विशेषणांची केवळ खैरात करत जाते. कवीचा शब्दवेल्हाळपणा इथे आशयच हरवून बसतो. पोटे यांची रचना सामान्यतः शुद्ध, निर्दोष आहे. तरी क्वचित छंदोबद्ध रचनेत काही ठिकाणी मात्रांचे हिशेब चुकतात. कधी 'गूढिमा' सारखा विचित्र आणि अर्थदुष्ट शब्द ते बनवतात. कधी 'गर्भारली दिठी' सारखी सकृद्दर्शनी गोड वाटणारी पण अर्थशून्य अशी प्रतिमा त्यांच्या कवितेत येते. पण अशी खटकणारी स्थळे त्यांच्या कवितांत मधूनमधून भेटत असली तरी ती फार थोडी आहेत ही समाधानाची गोष्ट आहे. एकूण ही 'गंधयात्रा' वाचकाला सुखद प्रत्यय देणारी आहे यात शंका नाही.

देविदास पोटे यांचा हा पहिलावहिला कवितासंग्रह आहे. त्यातल्या कवितांत नवशिकेपणाच्या खुणा असाव्यात यात फारसे नवल नाही. क्वचित कुठे रचनेचे वा अर्थाचे दोषही त्यात सापडतात. परंतु पोटे यांची काव्यात्मता अस्सल आहे. कवितेवरचे त्यांचे प्रेम उत्कट आहे. आणि आपली काव्यसाधना त्यांनी प्रांजलपणे परिश्रमपूर्वक केली आहे. कवितालेखनाच्या प्रारंभीच्या काळात या गोष्टींना फार महत्त्व असते. पोटे यांच्या 'गंधयात्रे' चा प्रारंभ तर चांगला झाला आहे. या वाटेचे सौंदर्य त्यांच्या प्रयत्नाला येत आहे तशी पुढच्या प्रवासाच्या खडतरपणाची चाहूलही त्यांना क्वचित लागलेली दिसते. त्यांचे शब्दप्रेम अनावर आहे. ते सुरुवातीला असतेच. आणि नवशिक्या कवीला ते शोभूनही दिसते. पण इथून पुढे शब्दसौंदर्याच्या प्रवेशद्वाराशीच रमून न जाता पोटे कवितेच्या अर्थसंपन्न गाभाऱ्यापाशीही जाऊन पोहोचतील आणि त्या अर्थसंपन्नतेचे बळ त्यांच्या या पुढच्या कवितांना लाभेल असा मला विश्वास वाटतो. त्यांच्या 'गंधयात्रे' ला मी सुयश चिंतिते आणि त्यांच्या नंतरच्या कविता वाचण्यास मी उत्सुक आहे असेही त्यांना मनःपूर्वक आश्वासन देते.

१९ आदर्श नगर
पुणे सातारा रोड, पुणे ३७

शान्ता ज. शेळके

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२६७८
काव्य २६२८७
८।३।८१

## काय म्या पामरे

तुम्हीच प्रेरणा
तुम्हीच अक्षरे
घडविले शिल्प
तुम्हीच फत्तरे
काय म्या पामरे बोलावी उत्तरे...

ओवीचे लावण्य
अभंगाचे रंग
शब्दांनी वहावे
तुमचे तरंग
गंध चराचरी : सांडुनी अत्तरे...

शब्दातील माझ्या
ओघळो मुलामे
मिटुनि अहंता
चिरंतन लेणे
पंख पावलांना साजिरे गोजिरे...

## इथे फक्त दिल्यानेच

उगा नको खेद करू
सारे आकाश आपले
पहा नियतीने सारे
बंध काटेरी कापले

जरी दोन ध्रुवांवर
झालो दूरस्थ आपण
परि पान्हावले मन
करी प्रेमाची रापण

पहा दिशांच्या अंगणी
गंध वायुने भरले
आणि हिरवे लाघव
पानापानांत रेखिले

जरी लोटला हा काळ
ओला हळदीचा वास
गोड गहिऱ्या स्मृतींनी
धुंद मोहरतो श्वास

नभ शिंपून चांदणे
भरी धरित्रीची ओटी
चिंब चिंब झाले मन
माया दाटलीसे पोटी

जरी कोसळे आभाळ
नये सोडू कधी आशा
ठेव मनात जपून
फक्त प्रकाशाची भाषा

नको उगाळीत बसू
उगा हिशोब कालचे
पहा क्षितिजापल्याड
नव्या स्वप्नांचे गालिचे

पहा विचारून मना
किती आभाळ वेचले
गर्भरेशमाचे क्षण
किती अंतरी साचले

दृष्ट लागेसा संसार
नाही काळोखाला थारा
आता वाहतील दारी
फक्त अमृताच्या धारा

आता सोनेरी स्वप्नांनी
रोज जागेल पहाट
आणि हळू थरारेल
जरा पापणीचा काठ

कशासाठी अट्टाहास
मागे पाऊल घेण्याचा
पुढे पुढे जाणे आहे
अर्थ मानवी जिण्याचा

कधी उमगेल तुला
खरे आयुष्याचे मर्म
प्रेम द्यावे : प्रेम घ्यावे
हाच जीवनाचा धर्म

आहे तुला काय ठावे
सारीपाट संसाराचा
सांभाळुनी एकमेका
असे आधार द्यायचा

नको करूस हिशेब
किती ऐश्वर्याचा थाट
जिथे समाधान मनी
काय कुबेराची ऐट

निरपेक्ष प्रेमसंग
सहजीवनाची खूण
गूढ गहिऱ्या सूराची
जशी छेडलेली धून

सखे संसार-सौख्याचे
ऐक गुपित सांगतो
इथे फक्त दिल्यानेच
रंग प्रेमाचा वाढतो.

लोक हो-

तुम्ही आहात इतिहासाचे चिरंतन शिल्पकार
युगायुगाचे भाष्यकार !
तुम्हीच आहात या भूमीचा हुंकार
तिच्या अणुरेणूत फुललेल्या स्वप्नांचा आकार !
निळ्याभोर आकाशगर्भातील गूढ स्पंदने
आहेत तुमच्याच जाणिवेचा आविष्कार !
लोक हो-
अनेक युगांनी आज पुन्हा
घडते आहे भवितव्य या मातीचे
पेटले आहे सर्वंकष युद्ध प्रकाश-तमाचे
पृथ्वीला व्यापणाऱ्या या निर्णायक संग्रामाचे
तुम्हीच आहात सर्वसाक्षी आणि
नि:पक्षपाती न्यायदाते !
चराचरातून उठणारी या मातीची नि:श्वसने
ऐका जिवाचे कान करून
आणि कौल द्या
हृदयाच्या प्रेरणेतून
इतिहासाच्या जाणिवेतून-
रक्तात फुललेल्या मातीच्या इमानातून !
नव्या युगाचा उद्याचा तेजस्वी सूर्य
तुमची वाट पहातो आहे :
नव्या युगांतराचीच चाहूल येत आहे.
लोक हो-
ऐका !

## मी आभाळ होतो तेव्हा

मी आभाळ होतो तेव्हा...
कवेत घेऊन रंगहीन दु:खे
अवघ्या मानवजातीची–
मिटवून टाकतो अनंत काळोख-गर्तेत.
माझे श्वास चांदणं होतात...
माझे डोळे संगीत गातात...
मी आभाळ होतो तेव्हा
वेचीत जातो शल्ये
अश्वत्थाम्याची हजार मरणे भोगणारांची.
उद्ध्वस्त मनामनांतून
पेरीत जातो दान
सुगंधी स्वप्नांचे.
नेत्रातील अश्रूंची फुले होतात...
सागर किनारे जवळ येतात...
मी आभाळ होतो तेव्हा

जळत नाही कधीच
तळमळणारी रात्र.
सारी नाती जडतात
ती फक्त रक्ताचीच
पृथ्वीवरच्या आयुष्यांना सांगत असतो
विश्वाच्या रहस्याचा नित्य, नवीन अर्थ
मी आभाळ होतो तेव्हा
चैतन्याच्या भूमिगर्भातून
पेरित जातो आभाळ
आणि उगवत जाते
मनामनांच्या जाणिवेतून
आभाळच आभाळ...
मी आभाळ होतो तेव्हा !

## शिवप्रभू राजे झाले

शिवप्रभू राजे झाले
सुख माहेराला आले
किती मनांच्या सागरी
शुभ्र चांदणे बुडाले

शिवप्रभू राजे झाले
आली चैतन्याला जाग
मावळ्यांच्या डोळ्यांमध्ये
नवे तेज जागे झाले

शिवप्रभू राजे झाले
पापी साम्राज्याला भीती
मनातल्या स्वातंत्र्याला
आज नवे अर्थ आले

शिवप्रभू राजे झाले
सूर्यचंद्र मोहोरले
पुलकित झाली माती
सुगंधाला स्वर आले

शिवप्रभू राजे झाले
स्वधर्माला तेज आले
समर्थांच्या मंत्रातले
शब्द अमृतात न्हाले

शिवप्रभू राजे झाले
गातो तुकया अभंग
आज संत-सज्जनांचे
आशीर्वाद फळा आले

शिवप्रभू राजे झाले
जिजाऊला धन्य झाले
उरामध्ये जपलेले
स्वप्न आज मूर्त झाले

शिवप्रभू राजे झाले
लक्ष दीप उजळले
आकाशाने धरतीला
दान नक्षत्रांचे दिले

शिवप्रभू राजे झाले
झाली आसवांची फुले
शोषितांच्या मुक्तीसाठी
सिंहासन विराजले

शिवप्रभू राजे झाले
अस्मितेचे राज्य आले
सह्याद्रीच्या छातीवर
शिलालेख कोरलेले

## तटस्थपणे

अलग होऊन तटस्थपणे न्याहाळावी
आपल्या मनाची स्पंदने,
विचार, विकार नि आत्मज्योती
निरंतर वेध घ्यावा
मनाच्या जागृत चैतन्याचा
नि अधिकाधिक अनुभवावे
शब्दातीत अलिप्त क्षण
"मी" म्हणजे मानवी विचारांची गंगोत्री
मीपण ओघळले की
दिसू लागतो अंतरातील नित्य प्रकाश !
विरघळावी जाणीव 'मी'ची कापरागत
जागृतीच्या प्रकाशात
निरामय चैतन्यात !
सारे न्याहाळावे परस्थ होऊन
समरसपणाने ! अलिप्तपणाने !

## फुलांच्या गावातील स्वप्नप्रदेशात....

रात्रीच्या अंधारगर्भातली एक स्वप्नपहाट
अनाम स्वप्नप्रदेश...फुलांचा एक गाव
फुलांच्या गावातील सुगंधाची एक नाव...
गर्द केशरियाचे रंग ओघळलेले
        आभाळाच्या पोकळाईवर;
फुलांच्या देठातून स्पर्शबावरा रोमांच
        सतारीतून स्वर-तरंग निघावे, तसा
क्षितिजा-क्षितिजावर सुगंधाची गाणी; एक झाड
        पापण्यांच्या पालखीत झुलणारे
डोंगरावरचे धुके कलेकलेने वितळले तेव्हा
        स्वप्न थेंबाथेंबांनी ओघळले
फुलांच्या डोळ्यांतले वेड लेवून पानापानांत
        आकारत गेलो
आतुरत्या हिरवाईत झुलावी आवेगी कळ
        तसा निनादत गेलो
फुलांच्या गावात सुगंधाला नित्य नवे अर्थ
        मेघातल्या चित्राकृतीसारखे
पानाला चुंबणाऱ्या पाकळ्यांतून आभाळगोड
        संदर्भ उगवणारे
फुलांच्या गावातील स्वप्नप्रदेशात...

## आठवणी

आठवणी : वेड्यापिशा, वेड लावणाऱ्या
आठवणी : गुलजार, मुलायम, सुगंधितशा
आठवणी : कुरवाळणाऱ्या, गर्भरेशमी, न्हाऊ घालणाऱ्या
आठवणी : बेफाम, उद्वेगी, हृदयाला जाळणाऱ्या
आठवणी : पंख उभारून तरंगत ठेवणाऱ्या
आठवणी : नकोसलेल्या, गर्द काळोखात लोटणाऱ्या
आठवणी : हळुवारपणे पदन्यास करीत येणाऱ्या
आठवणी : कोवळ्या, निरागस स्मितासारख्या, मनात घर करणाऱ्या
आठवणी : धुंद, रसिल्या सहवासाच्या; चांदणओल्या
आठवणी : हृदयाच्या स्पंदनावर विरहाचा दाह तोलणाऱ्या
आठवणी : सुखद गंधाच्या, लावण्यमयी मातीच्या
आठवणी : काळजातल्या फुलांच्या, स्नेहल डोळ्यांच्या
आठवणी : शैशवाच्या मुग्ध निरागस, यौवनातल्या हुरहुरणाऱ्या
आठवणी : काळोखाच्या कट्यारीने जाणिवांचे तळ छेदणाऱ्या
आठवणी : फेसाळत्या लाटेवर तरंगत राहणाऱ्या
आठवणी : गगन-झुला खेळणाऱ्या, झुलवत ठेवणाऱ्या...

## आज सौभाग्य सोहळा

आज सौभाग्य सोहळा
माझे हळदीचे अंग
झुले हातावर मेंदी
मनामध्ये स्वप्नरंग...

त्यांनी वळून बघता
धावे सर्वांगात वीज
ओझरत्या स्पर्शानेच
सारा मोहरला साज...

सप्तपदीत पाऊले
मन पोचले सासरी
माऊलीच्या डोळ्यांमध्ये
चिंब भिजली बासरी...

## धुवांधार रात्र

धुवांधार रात्र
काळोखाला धार
अमृताचे ओठ
तुझी गर्द मिठी...

मोहरली गात्रं
स्वप्न झाले नेत्र
पंखांतली ऊब
चांदण्याची दिठी...

रोमरोमी गंध
रातराणी धुंद
मौनातील साज
मंद वारा आज...

श्वासातले श्वास
मिटलेले ध्यास
डोळ्यांतली मात्र
गर्भारली रात्र...

## सोहोनी

पायातल्या चपला दाराआड सरकावून
सोहोनी आत आला
गाणं गुणगुणत हसला; अचानक थांबला.
पुन्हा एकदा खळखळून हसला,
आणि हसतच राहिला बराच वेळ; उगाचच
खुर्चीवरून उठून सोहोनी
खाली बसला
छताकडे पहात मांडीवर तालाचा ठेका
चाललेला; उगाचच
सोहोनीचे मनमुराद, निरागस गप्पाष्टक...
गावसकरची फटकेबाजी...सुंदर, छान वा;
'पूनम'ला कुठलं पिक्चर लागलंय हो ?
धा धा तिरकिट गदिगन धा धा.
आशयला नवीन भोवरा आणलाय का ?
या पदातला राग कोणता, बाबा ?
पुन्हा प्रपंच...वा वा, पुन्हा प्रपंच...वा, वा !
भावेवीण भक्ती भक्तीवीण मुक्ती ।
बळेवीण शक्ती बोलू नये ॥
कशी नशिबानं थट्टा आज मांडली...
सोहोनीच्याच तोंडी ही ओळ शोभते :
त्याचं ते आवडतं गाणं.
त्याच्या निरागस, भाबड्या जाणिवांची
अशीच थट्टा मांडलीय नियतीनं
सोहोनी : नेणिवेच्या काठावरचा
एक भोळाभाबडा जीव.

विमुक्त, विरक्त दंभहीन यात्रेकरू
अनादि, अनंत निरामय यात्रा.
कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ॥
सफेद लेंगा, अर्धा शर्ट आणि चपला
यातून त्याचे साधेपण
साऱ्या धारांनी मनावर ओघळते
" सोहोनी, बस ना तबल्यावर– "
" बसतो ना, वा वा ! "
बटबटीत डोळ्यांनी उगाच छताकडे पहात
मान नकारार्थी हलवीत, सोहोनी
खळखळून हसतो : अचानक थांबतो
पुन्हा हसतो; पण या वेळी केविलवाणे...
तबल्यावर सोहोनीच्या बोटांचे वीजेसारखे
थरारते नर्तन...
आजि आनंदु रे एकी परमानंदु रे ।
जया श्रुति नेति नेति म्हणती गोविंदु रे ॥
" वा, वा बाबा ! "
छताकडे पहात पुन्हा सोहोनीचे हास्य.
अंगात द्रुत लय : ' नेति नेति ' ची
लय वाढत जाते : अंगोपांगात भिनते
सोहोनीच्या मोठ्या डोळ्यांतील अनाद्यनंत भाव
जाणिवांना छेडीत जातो
लय वाढतच जाते.
सोहोनीच्या जाणिवे-नेणिवेचे कोवळेपण
तबल्याच्या ठेक्यातून घुमत रहाते :
धा तिरकिट तक गदिगन धा धा ॥
ता तिटकिट तक गदिगन धा धा ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
काव्य

## झुले सुखाचा हिंदोळा

झुले सुखाचा हिंदोळा
रात्र चांदण्यात खेळे
मना फुटले आभाळ
सर्व अंग झाले डोळे
दाही दिशांचा सोहळा
मिटे सुखाने पापणी
किती पाहू किती घेऊ
नभ उधळिले कुणी

## उद्या होईल प्रकाश

द्या हो टाकुनि निराशा
काळ लाजून थकेल
पहा लावूनिया जोर
खाली आभाळ झुकेल

किती अमृताचे क्षण
रोज फुलती जगात
आणि तळपते वीज
दूर सावळ्या ढगात

जरी अथांग सागर
असे त्यालाही किनारा
दैव देईल भरून
उणा पडेल घेणारा

जरी दुःखाचीच धग
आजवरच्या जीवनी
उद्या फुटेल पहाट
जरी गेले काळोखुनी

झडो अंधाराचे पाश
नव्या उजेडाची धून
दुःखामागुनी सुखाची
नित्य नियतीची खूण

पहा टाकून पाऊल
जरा आणखी खोलात
धुंद सनईचे सूर
पहा झुलती तालात

सोडा ग्रहांचे हिशेब
झेला चांदण्यांची फुले
पहा तुमच्या मुठीत
सारे आकाश मावले

पूर्ण पौर्णिमेचा चन्द्र
डाग त्यालाही लागतो
तसा दुःखाविना जन्म
जणू अपूरा भासतो

जरी वाटला तुम्हाला
फक्त कल्पनेचा साज
उद्या होईल प्रकाश
तुम्हा सांगतो मी आज

## कुठं आभाळाचा अर्थ

कुठं आभाळाचा अर्थ
कुठं अर्थाचं आभाळ
कुठं चैतन्याची देन
मन लावून सांभाळ

कुठं पाकळ्यांचे स्वप्न
कुठं स्वप्नांच्या पाकळ्या
कुठं भरल्या रानात
दिशा अजून मोकळ्या

कुठं प्रेमाचेच झाड
कुठं झाडांचेही प्रेम
कुठं फुलल्या कळीला
पहा विचारून क्षेम

कुठं पहाटले रंग
कुठं रंगांची पहाट
कुठं शब्दांची पालखी
जाते ओलांडून वाट

कुठं पावसाचे पक्षी
कुठं पक्ष्यांचा पाऊस
कुठं नकोसले थेंब
नको झेलून घेऊस

कुठं अंतरीच्या खुणा
कुठं खुणांचे अंतर
टाक जपून पाऊल
नको विलाप नंतर

कुठं दंभाची समाप्ती
कुठं समाप्तीचा दंभ
कुठं आनंद सागरी
घेई भरूनिया कुंभ

कुठं डोळ्यांत प्राजक्त
कुठं प्राजक्ताचे डोळे
कुठं भैरवीचा सूर
खोल अंतरात जळे

## पिठुर चांदणे

मोहरला चंद्र भिजुनि
पिठुर चांदणे
रात्रीच्या मिठीत निळे
गगन देखणे
काळजात करित घाव
मुग्ध चांदणे
अंतरात पेरी दाह
स्निग्ध चांदणे
वेडावीत नयनातील
फितुर चांदणे
ओझरत्या स्पर्शातील
आतुर चांदणे
चोरियले ह्रदय : तिच्या
मनी चांदणे
आत्मरूप बघत चिंब
जळी चांदणे
सर्वात्मक रानधुंद
चतुर चांदणे
मोहरले ऐलपैल
पिठुर चांदणे

## आपणच

नैराश्याच्या पट्टीनं बेतलेलं आयुष्य
जगायचं आपणच.
आयुष्यभरचे धुरकटलेले, रटाळ
हिशेब मोजीत;
आपणच काढायचे मायनस बॅलन्स-शीट !
घराण्यांच्या दगडी भिंतींचे कंटाळवाणे, आत्मकेंद्री इतिहास
आपणच पोचवायचे पुढच्या पिढीला;
आदर्श म्हणून !
आंधळ्यांच्या या जगात
डोळे मिटून दूध प्यायचे;
महात्म्याचे रक्त सांडत असताना.
इतिहासाला साक्ष ठेवून
आपणच विकायचे
आयाबहिणींच्या अब्रूचे निर्माल्य
पाशवी अल्लाउद्दीन खिलजींना
दीनपणे लाचार मुजरे करीत !
आपणच गायचे पोवाडे
युगपुरुषाच्या औदार्याचे;

कल्याणच्या सुभेदार-सुनेची
साक्ष काढून !
मांसल भोगातून शोधायचे
परमार्थाचे योग
शून्याच्या पोकळीत पहायचे
चिरंतन सत्याचे आभास !
सौंदर्याच्या प्रेतावर फुलं उधळताना
सौंदर्याची गाणी गायची;
रक्ताळलेल्या भूमीवरून चालताना
डोळ्यांत साठवायचे
बुद्धाच्या मुखावरील
निरागस, करुणामय स्मितहास्य !
येसूचे कारुण्य जपताना
उभारायचा नवा सूळ
पायाखालच्या मातीचे इमान
बळी देण्यासाठी !
पोथ्या-पुराणांतील बंदिस्त धर्माचे
करायचे कंठनाळ जयघोष
प्रेतांच्या राशीतून वाट काढीत
शुभ्र कबुतरे उधळायची आकाशात !
आपले रंगहीन, बेचव
हॅम्लेट झालेले आयुष्य
आपणच कुरतडायचे रात्रं-दिन;
मातीचे आवाहन विसरून
आपणच भरकटायचे दिशाहीन
आपल्या शरण-गाथेचे आपणच आहोत भाष्यकार
आपल्या सर्वनाशाचे आपणच आहोत शिल्पकार.

## अहिल्याबाई : कर्मयोगिनी ....तपस्विनी... !

अहिल्याबाई : कर्मयोगिनी आणि तपस्विनी....
एक कर्तव्यकठोर, प्रेरणादायी आदिशक्ती
अंतर्यामी जळत आसमंत उजळणारी महाज्योती...
नर्मदेच्या तीरावर महेश्वराच्या साक्षीने
इतिहासाला ललामभूत ठरलेले एक व्रतस्थ जीवन...
सत्ताधाऱ्यांच्या नामावळीत एक नितांत साधेपण
शोषितांना मनोमन आपले वाटावे असे सिंहासन...
पृथ्वीच्या भूमीवर आजवर झालेत सम्राट महान
पराक्रमी, दानवीर, धीरोदात्त आणि सत्यव्रती.
तलवारीच्या जोरावर त्यांनी नमविले
प्रबळ शक्तींना उन्मत्त सत्तांना...
पण तेज:पुंज आत्मिक सात्त्विकतेने
आणि नैतिक चैतन्याने

सत्ताधाऱ्यांना नमविणारी
ही एकमेव आणि अनुपमेय राज्य-धारिणी...
सत्त्वशील महातेजाने शत्रुहृदय जिंकणारी
तेजोमय, तेजस्विनी नभो–शलाका...
होळकर घराण्याच्या यशोमय पराक्रमाची दीप्ती
धर्म, सत्त्व, न्याय रक्षणार्थ कटिबद्ध असलेली मंत्र-शक्ती

•

योगधर्म आणि राजधर्म यांचे मनोरम
आणि डोळस संतुलन...
खाजगी उत्पन्नातून दानधर्म करण्याचा आदर्श
जगातल्या कुठल्याही शासकाला
ठरावा एक दीपस्तंभ...
राघोबादादा पेशव्यांचा राज्य जिंकण्याचा
दुष्ट, कावेबाज मनसुबा...
बिजलीप्रमाणे तळपणाऱ्या अहिल्याबाईंचा
तेजस्वी आणि बाणेदार जबाब :
" तुम्ही जिंकलात तर नवल नाही काहीच
हरलात तर बाईकडून हरलात म्हणून फजित व्हाल..."
मागे वळूनही न बघता राघोबा मुकाटपणे परतले...

•

ठग-पेंढाऱ्यांचे दंगे, बंड-फितुरी, घरभेद्यांच्या कारवाया
पेशव्यांची नाहक दटावणी, तुकोजींची रंगेल ख्यालीखुशाली,
मल्हारीचा विक्षिप्तपणा, पुत्र मालेरावाचा वाह्यातपणा
सासू, सासरे, पती, मुलगा, जावई, नातू यांच्या
मृत्यूंचे अकल्पित, अविरत आघात...

प्राणप्रिय कन्येचे सती-गमन...
अडचणींचे दुर्गम हिमालय
आयुष्यभर वाहत राहिलेला दु:ख-सोहळा...!

•

काळोख-यात्रा पचवून अवलंबलेली
स्फटिक शुभ्र, सडेतोड, लोकाभिमुखी राजनीती...
महादजी असोत की दस्तुरखुद्द पेशवे,
राजनीतीचे पाऊल चुकल्यास
त्यांनाही सुनावण्याचा नि:संकोच निस्पृहपणा...
या सात्त्विक आणि तेजोमय धाकामुळेच
पेशवे अत्यादरानं पत्रव्यवहारात लिहीत—
" गंगाजळनिर्मळ मातोश्री... ! "
उत्तरेत अहिल्याबाई आणि दक्षिणेत रामशास्त्री
हे पेशवाई युगातले दोन उत्तुंग कीर्तिस्तंभ...

•

आहिल्याबाईंच्या जाणिवांना होता मानवतेचा कणा
लोकदु:खाची जाणीव ही कार्यप्रेरणा अन् जीवन-धारणा...
पराक्रमाची पूजा, अपराध्याला शासन
विवेकाचे सिंहासन आणि करुणामय संवेदना...
अहिल्या ही सत्त्वशील आदर्शाची सर्वात्मक स्मृती
पुत्रप्रेमाहून लोकप्रेम युगसंजीवन मानणारी आत्मशक्ती...
अहिल्याबाई नावाची दीपज्योत
प्रत्येक शासकाने आणि मानवाने
आपल्या हृदयात तेवत ठेवावी
आणि आपले आयुष्य उजळून टाकावे...!

## रंग-लावण्याचा लळा

निळ्या लागला आभाळा
रंग-लावण्याचा लळा
मंद पहाटले गंध
धुंद उतरली डोळा

खेळे अंगात श्रावण
मनी प्रसन्न ओलावा
जाईजुईच्या कुशीत
शब्द वाऱ्याने बोलावा

जरा मिटता पापणी
स्वप्नशृंगार जांभळा
गोड लकेर तृप्तीची
हळू छेडिते कोकिळा

काळ्या रेशमी अंधारी
स्मृती गोंदिते चांदणे
देही लावण्य हिरवे
टिंब रेखिते देखणे

घन सावळ्या राईत
चिंब गवळण रंगात
पिसे लागले जिवाला
ऋतुलावण्य अंगात

सात रंगांची कमान
झुले गहिऱ्या नेत्रात
धून हळदी रंगाची
आली भरून गात्रात

काचा स्वप्नांच्या बिलोरी
प्रतिबिंबेही वेल्हाळ
धुवांधार आवेगाने
चिंब आभाळ आभाळ

## तुला मागतो दान

अमृतओवी भिजुन अंतरी यावी ओठावरी
रुसून बसता कृष्णबासरी यमुनाकाठावरी
नक्षत्रांचे वेचित मोती अज्ञाताला साद
जे गुणसुंदर त्यास लेवुनि ऐक आतला नाद
माथ्यावरती उंच गिरीच्या गंधकेशरी लाटा
लसलसणाऱ्या आत्मज्योतीच्या गूढ पहाव्या वाटा
वसंतवेड्या ऋतुरंगाचे मुक्त फुलावे गान
कशास आता विलंब वेडा : स्वैर फुलू दे प्राण
नकोसलेल्या टाकून खंती : नव्या नभाची आन
क्षण सोनेरी शतभाग्याचा तुला मागतो दान

## भिंत

थराथराने भिंत वाढते
उंच उंच
छतापर्यंत...
भिंत चारी बाजूंनी उभी असते
म्हणून घर बनते...
भिंत दगडांची असते
भिंत विटांची असते.
भिंत भीतीची असते
भिंतीला कान असतात
भिंतीला प्राण असतात
भिंत मंदिरात पवित्र बनते
भिंत महालात रंगेल बनते...
भिंतीला खिळे असतात
भिंतीला बिळे असतात
भिंत मार्ग अडविते
भिंत भुलावणी देते
भिंत चालतेही : भिंत बोलतेही
भिंतीत एक घर असते
भिंत मात्र त्याच्या पार असते !

## कुणी एक म्हणे

कुणाला घराची नको वाटे दिठी
कुणी घरासाठी जीव टाकी
कुणा घरी चाले भिंतींचा संसार
नसे प्रेमाधार एकमेका
कुणी हे बेघर घरात असून
कुणी घरावीण सर्वसुखी
कुणा घरी होई सुखाचेच ओझे
व्यर्थ तुझे-माझे चाले नित्य
कुणी एक म्हणे : 'घर' जर हवे
त्याआधी टाकावे मीपण हे

## या दिवसांचा

या दिवसांचा गंध अनामिक
या दिवसांचा स्पर्श आगळा
तरल क्षणांच्या लहरी लहरी
उठे मनावर कंप वेगळा

या दिवसांचा रंग मनोरम
या दिवसांचे स्वप्न गुलाबी
या दिवसांच्या डोळ्यांमधली
प्रेमरसाची धुंदी शराबी

या दिवसांचा सूर प्रफुल्लित
या दिवसांच्या मोहक वाटा
उंच उसळूनि गूढ स्वरांचे
शिल्प कोरती हृदयी लाटा

या दिवसांचे पंख पाचूचे
या दिवसांची ओढ अनावर
श्वासांमधले गहिरे स्पंदन
धुंदी उमटे गोड मनावर

या दिवसांची गति अखंडित
या दिवसांचा गर्भ रेशमी
प्राणामध्ये मिसळून जाते
या दिवसांची स्मृती मोसमी

## मनाचा मनवा

काळोखाचे फूल
उगवते डोळा
खुळी रानभूल
मनालाही चाळा
कोसळता वेग
मुळी आवरेना
अंतरी आवेग
मन सावरेना
काळोख काजवा
उजेडाचा थेंब
मनाचा मनवा
खेळतसे झोंब.

## स्त्रीजीवन : एक सर्कस

१

स्त्रीचं जीवन म्हणजे
एक परावलंबी शाश्वत सर्कस
आयुष्याच्या दोन बिंदूंत कसरत करणारी !
स्त्रीचा जन्म म्हणजे असीम अंतर्व्यथा
चिरंतन वेदनेची महागाथा...
नोकरी आणि संसार यांचा
ताल, तोल आणि सुवर्ण-मेळ साधणं
म्हणजे एक अग्निदिव्य
मैथिलीच्या पृथ्वीगर्भ दुःखाइतकेच तीव्र !

२

सकाळची गडबड म्हणजे
प्रकाशवेगाने धावणाऱ्या क्षणांची शर्यत
दमछाक करणारी...
घड्याळाचे काटे होतात राक्षसी हात
कळसूत्री बाहुलीसारखे नाचवणारे !
धाकट्याचे अंथरुणातले रडणे नि मुसमुसणारे हुंदके...
मोठ्याची शाळेची घाई...
युनिफॉर्म...दप्तर ...वॉटरबॅग...डझनभर पुस्तकं

सारं हवं असतं त्याला आईच्याच हातानं
कुकरची शिटी...धाकट्याची आंघोळ...यांचे इस्त्रीचे कपडे
शर्टाच्या बाहीचीसुद्धा घडी विस्कटलेली
चालत नाही यांना...
सारं वेळेवर नि व्यवस्थित हवं !
नाहीतर चांगला रेशीम-काठी टोमणा
असतो स्वागताला तयारच !
" गोरी, उंच, सडपातळ, गृहकृत्यदक्ष, मनमिळावू
सोशिक, पदवीधर आणि कमावती पत्नी
मिळवलीय ना मी ! जाहिरात देऊन ! "
भाजीला फोडणी देता देता
डोक्यात धावत असते ८.२५ची फास्ट लोकल...
मी : मुंबईकर ? छे, लोकलकर
मी : सळसळत्या, निराकार गर्दीतला एक रंगीत ठिपका.
गर्दी : आकार-हीन, स्वतःतच हरवणारी
तुडुंबलेल्या गर्दीत गळून जातात
मनाचे आनंदपंख
हरवलेल्या श्रेयासारखे !

३

ऑफिसची दगडी इमारत : स्थितप्रज्ञ, तटस्थ...
लिफ्ट...मस्टर...लेट मस्टर...
सी. एल...ई. एल...लिव्ह विदाऊट पे
( मेन विदाऊट शॅडोज ! )
पगार...बेसिक...डी. ए. सी. एल. ए.
एच. आर. ए., पी. एफ., लोन
दगड आणि माती...
केबिनच्या काचेमधून साहेबांची निरर्थक गुरगुर...

साऱ्या दिवसाचा तेजाळ नूरच जातो हरवून
असहाय नोकरीची मनःपूत चीड येते
नको-नकोसे वाटते सारे
पण नको म्हणून संपत नाहीत
मन विद्ध करणारे निर्दय क्षण...
कोळ्याच्या जाळ्यासारखं अवघं आयुष्य बांधलेलं
उभ्या-आडव्या बेबंद धाग्यांनी !
धाकट्याला निरोप देताना त्याच्या डोळ्यांत
चिंब भिजलेला आवेग
डोळ्यांपुढून काही केल्या हलत नाही...
टेबलावरच्या ॲन्युअल स्टेटमेंटचे कागदही
माझ्याकडे दटावल्या नजरेनं पहातच असतात !

४

आकाशात संध्याकाळ उतरली की
घरचे वेध लागतात नि
पायात उतरतं गतीचं अनिवार्य कालचक्र
नियतीच्या शाश्वत लेखानं बांधलेलं...
नवरोजीनं बोललं, पावसानं भिजवलं, अन्
नोकरीनं दमवलं, तर म्हणतात ना,
तक्रार कुणाजवळ करणार ?

५

६.१० च्या डबल-फास्टने आवाजाच्या कल्लोळात
कसरत करीत, भाजीची पिशवी नि पर्स सावरीत
घरी परतलं की,
पळभर छानपैकी विसावावं वाटतं...
पण आपले घरी आगमन झाल्यावर

पत्नीनं सुहास्य वदनानं करावं स्वागत
अशी पतिराजांची गोड नि गोंडस अपेक्षा...
आल्याआल्याच फर्मान सुटतं
नि मग उठावंच लागतं
सारे श्रम विसरून
फर्मास वगैरे चहा करण्यासाठी !

६

मुलांची मायेची ओढाताण...
नातेवाइकांची उणीदुणी बोलणी...
गणगोतांचे रुसवे...
साऱ्यांच्या आवडी नि अपेक्षा
जपता जपता
उरतच नाही आपलं अस्तित्व...
सर्वांच्या मनातली चांदण-वेल जपताना
हळूच फुलते हळवी ओढ
आपलं गुलबकावलीचं फूल शोधण्याची !

७

यांच्या डोळ्यातलं कौतुकाचं चांदणं...
मोठ्याची प्रेमभरली हाक...धाकट्याची मधाळ मिठी...
स्त्रीपणाची पूर्णता...मैत्रिणीचा जिव्हाळा...सहकाऱ्यांची आपुलकी
हे आयुष्याच्या वाटेवरचे आनंदाचे थेंब...
सारं काही सुसह्य करणारे !

८

खरंच, स्त्रीचं जीवन म्हणजे
एक मोबाईल सर्कस
नियतीच्या आकाशावर झूला खेळणारी !

## कुठे वाजती पैंजण

सवे घेऊन चांदणे
शिल्प बांधले मनात
स्वप्नसाजरा आवेग
बंद जांभळ्या क्षणात

तुझ्या आभाळ डोळ्यात
निळी चांदणपालवी
गंधबावऱ्या स्पर्शाची
ओढ मनाला भुलवी

तुझ्या डाळिंबी ओठात
जागे तृप्तीची पहाट
धुंदी स्वप्नाच्या गंधाची
काळ्या केसांमध्ये दाट

स्वप्न पापणी काठाशी
अंगी मोहर रंगाचा
जसा हिरव्या वेलीला
भार उभार अंगाचा

जाता हंसाच्या चालीने
मंद वायूचे नर्तन
काळ थांबून ऐकतो
कुठे वाजती पैंजण

खोल काळीज-नभात
आर्त पाखरांचे थवे
दूर नदीच्या पात्रात
का ग पेटलेले दिवे ?

## एक स्वप्न साधेच

एक स्वप्न साधेच
तुटले दुवे जोडण्याचे
रत्नभरल्या आभाळातून
आपला तारा शोधण्याचे

एक स्वप्न साधेच
फुलल्या रानी जाण्याचे
हरवलेले गंध शोधून
आपले गाणे गाण्याचे

## काळोखलेल्या कातरवेळी

काळोखलेल्या कातरवेळी
अंगांगातून उठावी कळ
तशी तुझी आठवण
भिनते नसानसांत
आणि विसरतो
मी अवघे अस्तित्व...
उदास, शून्य विमनस्क मनात
उठतात कल्लोळ बेबंद
तुझ्या डोळ्यांतील गंधभरी स्वप्ने
काळाचे कवच भेदून
करतात पाठलाग माझा
एकसारखी...
स्पर्शाची थरथरही
सळसळते, रक्ताच्या थेंबाथेंबातून
नैराश्यानं फोडलेले
मूक टाहो
जातात विरघळून
नकळत त्यातच...
तुझ्या मनातले निःश्वास
अजूनही करतात घायाळ
माझ्या हृदयाला
वाटत राहते तीव्रतेने
होशील तू समूर्त
अज्ञाताच्या अंधारातून
काळजावरचा आठवणीचा व्रण
पुसण्यासाठी...!

## मनाची पालवी हरवणारी

काळजावरून धारदार सुरी फिरवावी
तशी शब्दांची धग बोचणारी...
अस्वस्थ पेटलेल्या वादळाची लय
उसळत्या समुद्रात घोंगावणारी...
हरवलेल्या पंखासारखी जुन्या जखमांची
आवेगी सल ठसठसणारी...
शब्दांनीच वैरी होऊन केलेली जखम
हळवी, उदास, भळभळणारी...
चुकल्या वाटेने काळोख-पालखी मिरवत मिरवत
मनाची पालवी हरवणारी...

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२६९८
२६२८०
काव्य ८।२।९१

## चेहरा

चेहरा : आनंदविभोर, तेजाने ओथंबलेला
चेहरा : उदास, खेदमग्न, दु:खाने काळवंडलेला
चेहरा : भावनिर्भर, नितळ, बोलका
चेहरा : चंद्रमुखी, स्नेहाळ, चांदणओला
चेहरा : गुलाबी, प्रेमस्पर्शी, मोहक, गोड
चेहरा : गोरापान, आरस्पानी, ओढ लावणारा
चेहरा : गोरामोरा, संभ्रमित, बावरलेला
चेहरा : वेल्हाळ, गोंडस, सोनगर्भी
चेहरा : आवेगी, हळवा, आसुसलेला
चेहरा : चिमणा, गोल, लंबाकार, त्रिकोणी
चेहरा : रागीट, फसवा, आकसलेला
चेहरा : मुलायम, कांतिमान, वेड लावणारा
चेहरा : उदात्त, भव्य, उत्कटसा
चेहरा : रेखीव, नेटका, देखणा, आर्जवी
चेहरा : शीतल, सौम्य, धीरगंभीर
चेहरा : उतरलेला, वासनामय, किळसवाणा
चेहरा : आर्त, विरक्त, करुणामय
चेहरा : स्मृतिगंधात न्हाणारा, जाणिवा उजळणारा
चेहरा : प्रेमपंखी, आवाहन करणारा
चेहरा : काव्यतरल, हरवून टाकणारा...

## कळी कळी फुलताना

कळी कळी फुलताना
सुगंधित लाटा
स्वप्नातील गडद निळ्या
बहरतील वाटा

कळी कळी फुलताना
गंध उमलले
अंतरंगी रंगता
गूज उमजले

कळी कळी फुलताना
लावण्य सोहळा
निळ्या अंबरास लागे
मातीचाच लळा

कळी कळी फुलताना
ऋतुंचे संदर्भ
मंत्र-जागल्या मातीत
अंकुरले गर्भ

कळी कळी फुलताना
मोदभरी धून
सर्वभरी चराचरी
केशराचे ऊन

कळी कळी फुलताना
श्रावणाचे शिल्प
तन तरंग होताना
मन कल्प कल्प

## बोभाट

जळी भरे काठोकाठ
तिच्या डोईवर माठ
रुते भरजरी ओला
गोऱ्या दंडावर काठ

थेंब पाण्याचे पडता
ओली थरारते वाट
ओल्या पावलांची मेंदी
पाहे ध्यानस्थ हा घाट

असा अवखळ वारा
खेळे पदराशी थेट
डोळ्यांतल्या निळाईची
सजणाशी स्वप्नभेट

उरी कसले काहूर
अशी काळजात गाठ
वारा आणि पदराचा
झाला उगाच बोभाट

## सप्तक

१

किर्र रात्र
संभ्रमाची
वादळवेडी
मनात काळोख
उसवलेला
व्याकुळ-काळा !

२

सरणार कधी
उदासवाणे संदर्भ
फुलणार कधी
गंध-गाणे सोनगर्भ
फुटणार कधी
आशेला अंकुर नवे
उठणार कधी
ऊर्मींचे गगनथवे

३

पाऊसवेडी रात्र काजळी
रिमझिम श्रावणधारा
तरल मनाचा आवेगाने
झुलतो मोर पिसारा

४

आनंदघन थरथरणारे
पंखावरती प्राणामधल्या
मुक्त थेंब हे उमलणारे
पानावरती गानामधल्या
पहाटवेडी गंधभुलावण
श्वासामधले गगन बावरे
चांदणओल्या चिंब मैफली
डोळ्यामधले मंत्र लाजरे

५

सौंदर्याला गर्भ राहिला
चैतन्याचा कोमल तान्हा
मन गेले ओथंबून
जसा उरी फुटे पान्हा

६

श्रावणधारा
विलसत वारा
दंग मनाचा
उमलत पारा

७

किती दिगंत सागर
किती पसरले जळ
पण तहानेला हवी
एक झऱ्याची ओंजळ

## तोच नभात चांदवा

तोच नभात चांदवा
रोज नवीन चांदणे
तीच ओळखीची झाडे
नव्या पालवीचे लेणे

तोच नदीचा प्रवाह
परि रोज नवे पाणी
तेच पाखरांचे सूर
परि रोज नवी गाणी

तीच रोजची सकाळ
नवे ऋतूंचे लावण्य
तीच पापणीत दिठी
नवे स्वप्नांचे कोंदण

तीच सौख्याची किनार
परि रोज नवी धून
तीच जरी रंगधारा
रोज नवी मंत्र-खूण

तेच ओळखीचे शब्द
नव्या अर्थवाही वाटा
तीच सागराची गाज
परि रोज नव्या लाटा

## नाही कळले कुणा

अंधाराच्या गर्भामधुनी प्रकाशधारा ओघळताना
चित्र जळातिल बिंब पाहुनी चंद्र लाजुनी मोहरताना
चिमणे पक्षी घेउन वक्षी सान पिलांना जोजविताना
मंद वायुवर कुंदकळ्यांतुन श्रावणसौरभ दरवळताना
पानामधले हिरवे लाघव : फळभारांनी लवलवताना
लोभसवाणे छेडित गाणे सूर लाजरे थरथरताना
डोळ्यांमधले रंग जाहले दंग मनावर नक्षत्रांच्या खुणा
पडली श्रावणमिठी झुकली दिठी अनावर नाही कळले कुणा

## आज पाऊस पाऊस

आज पाऊस पाऊस
चिंब अंगात भिजला
आज डोळ्यांच्या डोहात
मेघमल्हार रंगला

आज हिरव्या रानात
ओला उत्सव पानांचा
निळ्या सागरलाटेत
देठ भिजला मनाचा

आज आतुर आभाळी
रिते आषाढ-श्रावण
खोल मनात चालले
एकतारीचे भजन

ओले काऊचे घरटे
तिचा आकांत सावळा
खेळे पिलांच्या डोळ्यांत
मुक्त पर्जन्य सोहळा

आज पाऊस पाऊस
गंध मातीचा आभाळी
देही सौभाग्य हिरवे
टिंब रेखिले कपाळी

आज पाऊस पाऊस
मन पाऊसपणात
निळा नितळ ओलावा
तना-मनात प्राणात

## चंद्र सांभाळ गं

चंद्र सांभाळ गं, चंद्र सांभाळ गं
निळ्या स्वप्नातले गंध सांभाळ गं
दीप हाती दिला : ज्योत सांभाळ गं
मोर पंखांतले रंग सांभाळ गं
सान डोळ्यांतली स्वप्नं सांभाळ गं
राजहंसाचे तू पंख सांभाळ गं
शब्द हुंकारतो अर्थ सांभाळ गं
बंद मुठीतले विश्व सांभाळ गं

## मी पाहिले ना

मी पाहिले ना,
कळीतून फूल उमलले तेव्हा...
रानवेरी गंध
पसरला तेव्हा
मी पाहिले ना,
काळोखातून चांदणे झिरपले तेव्हा...
रात्र अंगांगांनी
भिजली तेव्हा
मी पाहिले ना,
तुझ्या डोळ्यांत स्वप्न थरारले तेव्हा...
तुझ्या स्वप्नात
मीच आलो तेव्हा...

## मनी लागुनी झुरणी

अर्पणाची रात्र आणि
पावसाची सर्द हवा
ढगाआड पहुडलेला
पौर्णिमेचा चंद्र नवा
अर्पणाची गोड तृप्ती
भरे काठोकाठ मनी
चंद्र हळूच डोकावे
मनी लागुनी झुरणी

## तुमचा न्याय

मस्तीत माझ्या गात असता
दाबता माझा गळा
मौनावल्यावरी म्हणता; गा रे
लागला तुझा लळा

## मथितार्थ

तुम्ही ओंजळभर फुलं टाकलीत
माझ्या परडीत
त्यांचा गंध
गगनांगणात
राना-पानात...
प्राणा-मनात...
तुमच्या माझ्या संबंधांतील
प्रमेयाचा
हाच मथितार्थ आहे !

## दशक

माग म्हणालास वर
म्हणुनी दे विश्वंभर
माणसाच्या जाणिवेला
ओलाव्याचा नवा स्वर

•

सप्तपदी चालल्याने
सात जन्म गुंतवण
मग जन्मांच्या चक्राची
कशी काय सोडवण ?

•

माझे मन तुझे झाले
तुझे मन माझे झाले
आयुष्याचे मग सांग
कशामुळे ओझे झाले ?

•

अशी बघता बघता
झाली ऊन उतरणी
लाल पावलांची मेंदी
नेली उतरून कुणी ?

•

आयुष्याला अस्मितेची
खरे आहे जोड हवी
परि चालताना वाटा
थोडी तडजोड हवी

•

माझ्यासाठी ज्ञानेश्वरी
तुकयाचा नि अभंग
आता जन्मजन्मांतरी
विठूरायाचाच संग

•

कुणी करीत शिंपण
कुणी करीत लिंपण
कुणी आपल्या अंगणी
नवे घालीत कुंपण

•

कोण कुणासाठी जगे
कोण कुणासाठी रडे
माणसाच्या मूर्तीलाच
जाऊ लागलेत तडे

•

जाता जाता म्हणे पाजा
मला गंगेचेच पाणी
आणि जरा ऐकवा हो
माझ्या बहिणाईची गाणी

•

किती क्षण वाया गेले
त्याची कर मनी स्मृती
त्यानं वाढता वाढेल
जीवनाची अभिरुची

•

## तीन शब्दुल्या

पापणीच्या दाराआड
घनआनंदु प्रकाशे
प्राजक्ताच्या पानाआड
सूर लपलेला दिसे
विश्व मावेना उरात
पान्हा दाटू दाटू आला
पावसाच्या थेंबातून
चंद्र भूमीवर आला

●

तुला-मला धुंद मिठीत
पानानं पाहिलं
रानानं पाहिलं
चंद्रानं पाहिलं
तू आभाळगंधा : अवघडलेली
तुझ्या ओटीतून
चांदणं ठिबकलं

●

बकुळफुलांचा गंध घेऊनि
वाहे सागरवारा
तरल धुक्याच्या बुरख्यामधुनि
बरसे श्रावणधारा
पाऊसवेड्या होती फुलांना
प्रेमाचे भास
काळोखातील वेड लाविती
मुग्ध कळ्यांचे श्वास

## कुठून काय ?

        कुठले पाप ?
        कुठले शाप ?
कुण्या जीवाला कसा अनुताप ?
        कुठून हर्ष ?
        कुठून खेद ?
माणसाच्या जातीत कुठून भेद ?
        कुठून उन्माद ?
        कुठून चित्कार ?
कुण्या गर्भातला करुण हुंकार ?
        कुठून आकाश ?
        कुठून धरणी ?
कुणाचे निर्माण : कुणाची करणी ?
        कुठून जनन ?
        कुठून मरण ?
साऱ्या पसाऱ्याचे कुठले कारण ?
        कुठून अस्तित्व ?
        कुठून मी ?
अनंतातली ही कसली ऊर्मी ?
        कुठून काय ?
        मनावर साय
मातीचा देह : मातीचे पाय !

## सात हायकू

इथे पूर्वी घनदाट राने होती
आता छान कॉलनी झाली :
पाखरे विस्कटून गेली...!

दोऱ्याला कापडात गुंतवून
सुई आपली नामानिराळी
टोकदार निष्ठेची रीत आगळी!

चांदणं पिता पिता चकोर म्हणाला—
चकोरी, अगं जपून बरं का :
हल्ली चांदणंही प्रदूषित झालंय्

ओझरत्या मृदु स्पर्शाने
मनाचा पदर मोहरला
फुलपाखराला कसला भास झाला ?

स्वप्नांचे गाठोडे काट्यांवर टांगून
प्रवासिनी मार्गस्थ झाली
पिंपळपाने का बरं सळसळली ?

धुवांधार सभा आटोपून
कॉमरेड अखेर झाडाखाली विसावला
गुलमोहोराने त्याला लाल सलाम केला

एक मुंगी दुसरीला म्हणाली,
" खरंच का तुला काही जमत नाही ?
अगं मग तू कविता लिही ! "

## शिल्पस्थ सोनचाफे

आकाश रंगवेडे स्वप्नी थिजून गेले
डोळ्यांत अक्षरांचे गाणे भिजून गेले
क्षितिजावरी सुरांची नव्हती पहाट झाली
नि:शब्द स्पंदनांनी तारे विझून गेले
पंखात सावलीचा घेऊन गंधवीणा
श्वासामध्ये किनारे सारे रुजून गेले
स्वप्नील चांदण्याची गेली निघून दिंडी
घननीळ अक्षरांनी अश्रू सजून गेले
आवर्तनात वेड्या न्हाले चकोर पक्षी
शिल्पस्थ सोनचाफे सारे पुजून गेले

## एक आनंदगर्भ स्मितरेषा

सकाळची कोवळ्या उन्हातली प्रसन्न वेळ
मंद, सुगंधी वाऱ्याचे हळुवार आवर्त
हिरव्या पानांवर डोलत असलेले
त्या मानसवेळी
तुला पहिल्यांदा पाहिलं
तेव्हापासून मनावर उमटून राहिलं
तुझं मनविभोर स्मित.

हे टवटवीत हास्य
हृदयात करते आहे आनंदाची पखरण
हे स्मित आहे मुलायम
मखमली किनारीसारखं
अन् त्याला आहे बटमोगऱ्याचा केशरगंध
या हास्याच्या प्रसन्न धारेत
भिजून जाते आरपार माणसाचे मन
रोमरोम पुलकित होतो
अंगांगात आनंदाच्या पौर्णिमा उमलतात...
ही लोभस स्मितरेषा म्हणजे
तुझ्या कोमल कांतीचं जणू मोहक लेणं
तुझ्या स्मितातून जणू
चैतन्याचे माणिकमोती उधळीत राहतेस
तुझ्या स्मिताची कोवळी प्रसन्नता
अनुभवली की पळभर
विसर पडतो अस्तित्वाचाच...
तुझ्या सहज येणाऱ्या सजग स्मित लहरी
करतात जाणिवांवर मनोरम पदन्यास
या सदाहरित स्मिताला
कुठेही अहंकाराचा ओरखडा नाही किंचितसाही;
मोठेपणाच्या पोकळ जाणिवा
विरघळतात तुझ्या स्मिताच्या चांदण्यात
माणूसपण लुटणारी
आत्मकेंद्री आवर्तांची वर्तुळं
आरपार छेदिली जातात
तुकड्या-तुकड्यांत लोपून जातात

तुझ्या स्नेहल नेत्रांतून दिसतो
निगर्वी विनय नि शालीनता
कोमलतम सोनकळीचा मृदुलपणा
आणि चंद्रकिरणांची वेल्हाळ शीतलता
सहजपणे पसरते मनाच्या आकाशावर...
तुझ्या अवघ्या व्यक्तिमत्त्वात
कुठेही वास नाही कृत्रिमतेचा
तुझ्या शब्दांत आहे
एक अनामिक लाघव
आणि पहाटपंखी सुरावटींचा गोडवा...
तुझ्या रंगकुसुंबी लावण्याला
आहे आरस्पानी निळे नितळपण
मन:पूत असे पारदर्शीपण......
रंगभोर हिरवाईत बहरावा प्राजक्त तसे
अलवार रेशीम-गंधासारखे
तुझे आशयघन स्मित...
दुसरे एक स्मित,
मोनालिसाचे
मुग्ध आणि गूढ...
मोनालिसा
आणि तू
एकाच चिरंतन सूत्राच्या आनंदयात्री
शाश्वत स्रोताच्या दोन प्रकाशधारा
ओथंबून मनात वाहणाऱ्या...
कुठल्यातरी अनामिक ऋणानुबंधानं
मनात जागविते सुगंधाचा पैस
एक आनंदगर्भ स्मितरेषा....!

काव्य

## गाणे मनात ओले

क्षितिजावरी सुरांचे आकाश मंत्रिलेले
स्वरधुंद मैफलीचे गाणे मनात ओले
हिरव्या पहाटवेळी हळवी लकेर यावी
ते दर्द हो दिलांचे तालात बांधलेले
डोळ्यात याद गहिरी धुंदीतल्या क्षणांची
संकेत श्रावणाचे तारांत छेडलेले
हळुवार रोमरोमी सनई निळ्या स्वरांची
निशिगंध आर्जवांचे गात्रांत शिंपलेले
झुलते अजून वेडी प्राणामधे बिराणी
आवर्त भैरवीचे स्वप्नात भारलेले
संदर्भ जाणिवांचे सारे मिटून गेले
स्वरधुंद मैफलीचे गाणे मनात ओले

## मातीतच रुजली कविता

आवर्त मनाच्या देठी, ऋतुंची चराचर व्याप्ती
गात्रांतील अंधाराला हृदयातील उजळीत दीप्ती
चोचीत चांदणे ओले घेऊन उडाले पक्षी
रुधिरातील स्वप्निल धुंदी गगनावर कोरित नक्षी
आवेग नभाचा वर्षत मातीला चिरंतन दान
एकान्त निळा अंगात स्पर्शाचे रिमझिम रान
मातीच्या वक्षामधली चिरदाही शल्ये भोळी
मातीतच रुजली कविता आकाश वाचते ओळी

## टाकित ये पदन्यास

टाकित ये पदन्यास प्रणयप्रभा हासरी
रुणझुणती नुपुर-नाद प्रतिध्वनी अंतरी
अजाणता प्रेमपंखी तिने मला कवळिले
सर्वभरी थरथरली प्राणांतुन शिरशिरी
सर्वांगे स्वर्गीचे अधरामृत प्राशिले
उमलली सुखवून गोड कळी लाजरी
त्या धुंद अनाम क्षणी काळ जणू थांबला
उगवली प्रणयाची लक्ष फुले अंबरी
काय सांगू ? शब्दातील अर्थ जणू संपले
संवेदना तृप्तीची पसरली दिशांतरी

## हा हिरवा एकान्त पुन्हा

शब्दांवीण सांज आज मुक्त राहू दे
चांदण्यात प्रीतीच्या तुझ्या न्हाऊ दे
अंग अंग मोहरले रंग बहरले
गर्भातील मातीचा गंध सेवू दे
ऋतुभरले साद मनी भरून घेऊ दे
डोळ्यांतील थरथरते स्वप्न पाहू दे
श्रावणाची गंध-मिठी : धुंद होऊ दे
स्पर्शातील लाटेवर चिंब होऊ दे
तुझ्यासवे पापणीचे पंख मिटू दे
हा हिरवा एकान्त पुन्हा पुन्हा भेटू दे

## चंद्रगौर आनंदाचा

फुले प्रेमाचा सुगंध गोड कळीच्या देठात
चैत्र चांदण्याची धून तुझ्या मायाळू ओठात
अशी मनी थरारून कळी बिलगे वाऱ्याला
भरे आभाळाचे बिंब तुझ्या टपोऱ्या डोळ्यात
खूप काही सांगायचे मन चिंब चिंब होते
शब्द वाहुनिया जाती अर्थ उरतो मनात
श्रावणात धुंद माझे मन ओलाव्याने होते
हरवतो ऐलपैल तुझ्या स्पर्शाच्या लाटांत
जाता काळोखून प्राण ओझरती होता भेट
चंद्रगौर आनंदाचा गंध झुलतो मनात

## प्राणांतून प्रीतीचे

प्रेम· तुला अर्पिले, हृदय तुला वाहिले
प्राणांतून प्रीतीचे गीत तुझ्या गायिले
चंद्र-भोर धुंद रात्र पाहिले प्रथम तुला
चांदण्याचे तव नयनी स्वप्न भरून राहिले
मधाळ शब्द प्रीतीचे रुणझुणती अजुनी मनी
मोहरती गर्द स्मृती, श्वास स्तब्ध जाहले
गौर, मृदु स्पर्शी तुझ्या टपटपल्या मंजिरी
मृदुल गंध स्वप्नींचे गात्री तुझ्या उमलले
विरहाचा आर्त दाह जाळितो मला : तुला ?
कशास सांग गूढ सखे मौन असे पाळिले ?
रानातुनी पानातुनी प्रतिध्वनी गुंजले
प्राणातून प्रीतीचे गीत तुझ्या गायिले

## कळाया लागले

मुखवटे तयांचे गळाया लागले
रंग उजेडाचे कळाया लागले
मिटताच ईर्षा, अहंकार वेडे
अर्थ जाणिवांचे कळाया लागले
गल्बते घेऊन चाललो वादळी
हातांचे आधार मिळाया लागले
लागताच शोध आपल्या ध्रुवाचा
संभ्रम–पिशाच्च पळाया लागले
मनाच्या गोकुळी वाजली बासरी
दिवे अत्तराचे जळाया लागले
उघडले आता पंख पापणीचे
गीत पाखरांचे कळाया लागले

## मेंदीत चांदण्याच्या

नक्षत्र पावलांनी घरट्यात गंध आले
मेंदीत चांदण्याच्या शिल्पास रंग ओले
हळुवार अक्षरांची आली भरात दिंडी
थेंबात पापणीच्या आवर्त शिंपिलेले
चौफेर भरलेले गुल्मोहोर लाल गाली
चैत्रात चांदण्याला स्वप्नील भास झाले
पंखात आठवांची प्राणार्त धून वेडी
लाटेत सागराच्या गाणे पहाटलेले
डोळ्यांत पाखरांच्या प्राजक्त चिंब झाले
मेंदीत चांदण्याचे न्हावून शिल्प गेले

२६९८
२६२८७
काव्य
८।२।९७

## गंधयात्रा आज आहे

गर्द हिरव्या वेलीवरती मंत्रवेड । बाज आहे
रक्तरंगी पाकळ्यांना सोनगर्भी साज आहे
उमलणाऱ्या मृदु कळ्यांना नववधूची लाज आहे
भिरभिरत्या भ्रमरांना यौवनाचा माज आहे
खळाळत्या प्रवाहाला सतारीचा बंध आहे
दंवामध्ये भिजलेल्या मातीलाही गंध आहे
निळाईत खोल जळी गगनाचे अंग आहे
मंद गहिऱ्या सुगंधाला रानवारा संग आहे
वनामध्ये रोमरोमी अज्ञाताचा नाद आहे
अणुरेणूतून धुंद जीवनाला साद आहे
गगनवेरी पाखरांचा नाचरा उन्मेष आहे
प्रकाशाला स्वप्नपंखी रेशमी आवेश आहे
चराचरी गूढिमा अनादि-अनंत आहे
गंधवेडी स्वप्नमाला दाटली दिगंत आहे
मुक्त वेड्या पावलांची या धरेवर गाज आहे
सौंदर्याच्या चैतन्याची गंधयात्रा आज आहे

REFBK-0026279
REFBK-0026279



"गंधयात्रा" मधील कविता वाचताना सर्वप्रथम मला जाणवली ती पोटे यांची आत्मलक्षी, निर्भरशील, सौंदर्यप्रेमी आणि स्वप्नाळू वृत्ती. त्या वृत्तीशी इमान राखूनच त्यांनी आपल्या कविता लिहिल्या आहेत. इथे जी शब्दकळा, जो कल्पना विलास आणि जे जीवनदर्शन आहे ते पोटे यांचे स्वतःचे आहे. या प्रांजलपणामुळे "गंधयात्रा" मधींल अनेक कविता अस्सलपणाने मनावर ठसतात.

"आपणच," "मी आभाळ होतो तेव्हा", यासारख्या काही सामाजिक आशयाच्या कविता त्यांनी लिहिल्या असल्या तरी त्यांची कविता खरी फुलून येते ती प्रीतीच्या तृप्त सहवासात, निसर्गाच्या विविध रंगात आणि स्वप्नांच्या तरल प्रदेशात.

पोटे यांच्या कवितेत एक नितळ निर्भरपणा आहे, जीवनावरचे उत्कट प्रेम आहे, उदंड आशावाद आहे आणि निसर्गाच्या रंगरूपाची, गंधाची संवेदनाक्षम जाण आहे. त्यांची शब्दकळाही प्रसन्न आहे. त्यांच्या काही प्रतिमा नाविन्यपूर्ण आहेत व कवितेच्या आशयाला त्या एक वेगळे परिमाण देताना दिसतात.

एकूण ही "गंधयात्रा" वाचकाला सुखद प्रत्यय देणारी आहे यात शंका नाही.

शैला ज. शेळके